

# ५०० कोटींची बचत

## मेट्रोच्या मातीचा पोर्ट ट्रस्टकडून बर्थ भरावासाठी वापर

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

- खोदकामातून हजारो मेट्रिक टन माती बाहेर
- पोर्ट ट्रस्टला निःशुल्क पुरवठा
- विल्हेवाट लावण्यासाठी मेट्रोलाही जवळचा पर्याय

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूमिगत मेट्रोच्या खोदकामातून निघणारी हजारो मेट्रिक टन माती अखेर मुंबई पोर्ट ट्रस्टच्या कामी आली आहे. जवाहर द्वीप येथे क्रूड इंधन साठवण्यासाठी उभारत असलेल्या बर्थच्या भरावासाठी ही माती उपयोगास येत आहे. त्यामुळे पोर्ट ट्रस्टची सुमारे ५०० कोटींची बचत झाली आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने ही माती पोर्ट ट्रस्टला निःशुल्क दिली आहे. ती मिळाली नसती, तर पोर्ट ट्रस्टला भराव टाकण्यासाठी स्वतंत्र निविदा मागवावी लागली असती व १३ हेक्टरच्या विशाल भूभागावर बर्थ उभारण्यासाठी टाकाव्या लागणाऱ्या या भरावाचा खर्च ५०० कोटींच्या आसपास येत होता. पोर्ट ट्रस्टला माती दिल्यामुळे कॉर्पोरेशनच्या खर्चात थेट कपात झालेली नाही, मात्र मातीची विल्हेवाट लावण्यासाठी जवळचा पर्याय उपलब्ध झाला आहे. मातीची विल्हेवाट लावण्यासाठी कॉर्पोरेशनने यापूर्वीच कंत्राटदाराला रक्कम अदा केली आहे. माती मुंबईबाहेरील तीन ठिकाणी टाकली जात आहे. मात्र त्यासाठी दूरवर वाहनांना फेऱ्या माराव्या लागतात. परिणामी वाहतूक खर्च वाढतो. आता मुंबई बंदरातच ही सोय झाल्यामुळे वाहतूक खर्चात लक्षणीय कपात होईल.

मेट्रोचा भराव यापूर्वी कोस्टल रोड किंवा अरबी समुद्रातील नियोजित शिव स्मारकारसाठी वापरला जाणार होता. मात्र हे दोन्ही प्रकल्प अजून सुरू झालेले नाहीत. याउलट मेट्रोच्या बांधकामाने चांगलीच गती घेतली आहे. खोदकामातून रोज हजारो टन माती निघत आहे. त्यामुळे हे प्रकल्प सुरू होईपर्यंत वाट पाहणे व्यवहार्य नव्हते. तोपर्यंत खोदकामातून निघालेल्या मातीचे करायचे काय, असा प्रश्न निर्माण झाला असता. पोर्ट ट्रस्टच्या भरावासाठी मेट्रोची सगळीच माती आवश्यक नाही. मात्र मातीचा मोठा हिस्सा जरूर कामी आला आहे.

मेट्रो खोदकामातून शिवाजी पार्कसारखी १४ मैदाने निर्माण होतील, एवढी माती निघणार आहे. १३.८ लाख चौ. मीटर भूभाग व्यापेल एवढी ही माती आहे. रोज किमान ७५ ते १५० ट्रक माती वाहतूक करतात. ही माती मुंबईपासून ५० किमीवर निश्चित केलेल्या जागेवर टाकली जाते. एक ट्रक माती वाहतुकीसाठी सात हजार रु.खर्च येतो. दिवसाला ७५ ट्रकची वाहतूक झाली, तरी हा खर्च २५ लाखांच्या घरात जातो. एका अर्थाने प्रकल्पाच्या मातीचा एकूण वाहतूक खर्च ३०० कोटींच्या आसपास आहे.



**भरावासाठी उत्तम माती**

मेट्रोचे खोदकाम जमिनीखाली २० मीटर अंतरावर होत आहे. एवढ्या खाली खोदकाम होते, तेव्हा बेसॉल्ट खडकाचे तुकडे मोठ्या प्रमाणावर लागतात. हा खडक भरावासाठी उत्तम मानला जातो.